# दुर्गे दुर्घट भारी

Durge Durghat Bhari — Durga Devi Aarti · Sant Narahari

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी ।
अनाथनाथे अंबे करुणा विस्तारी ॥
वारी वारीं जन्ममरणाते वारी ।
हारी पडलो आता संकट नीवारी ॥०१॥

> जय देवी जय देवी जय महिषासुरमर्दिनी, हो दैत्या सुरमर्दिनी ।
> सुरवरईश्वरवरदे तारक संजीवनी ।जय देवी जय देवी ॥

त्रिभुवनी भुवनी पाहतां तुज ऐसे नाही ।
चारी श्रमले परंतु न बोलवे काहीं ॥
साही विवाद करितां पडलो प्रवाही ।
ते तूं भक्तालागी, ते तूं दासालागी पावसि लवलाही ॥०२॥

प्रसन्न वदने प्रसन्न होसी निजदासां, होसी निजभक्ता ।
क्लेशापासूनि सोडी, दुःखापासूनि सोडी तोडी भवपाशा ॥
अंबे तुजवांचून कोण पुरविल आशा ।
नरहरि तल्लिन झाला पदपंकजलेशा ॥०३॥